**महाराष्ट्र शासन**
**महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ**
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, 49, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400 051.
दुरध्वनी क्र.26474435, Email : chairman-msbve@nic.in / msbve2003@yahoo.com Web site :- www.msbve.gov.in

क्र. मराव्यशिपमं/का-1/ मान्यता विभाग/2019/922
दिनांक : 31/8/2019

परिपत्रक

विषय : सत्र 2019-2020 करीता मंडळाच्या मान्यताप्राप्त संस्थांना विद्यार्थी प्रवेशाची अंतिम तारीख वाढविणेबाबत.

मंडळाच्या मान्यताप्राप्त संस्थांना विद्यार्थी प्रवेश करण्यासाठी यापूर्वी दिनांक 31/8/2019 ही अंतिम तारीख देण्यात आलेली होती. मात्र संगणक प्रणालीमधील विविध अडचणींमुळे अद्यापही अनेक संस्थांना विद्यार्थी प्रवेश मान्यता / नुतनीकरण मान्यता/ तुकडी वाढ देण्यात आलेली नाही. त्यामुळे संस्थांना विद्यार्थी प्रवेश घेण्यामध्ये अडचणी येत आहे. त्याचप्रमाणे अनेक संस्थांकडून प्रवेशाची अंतिम तारीख वाढविण्याची मागणी होत आहे. ही बाब लक्षात घेता 1 वर्ष, 2 वर्ष व 6 महिने कालावधी अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश मुदत दिनांक 30/9/2019 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

असेही सूचित करण्यात येते की, सहामाही अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांनी ऑक्टोबर 2019 ते जानेवारी 2020 या सत्रामध्ये प्रशिक्षणार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण व्हावा म्हणून प्रशिक्षण कालावधी 4 तासऐवजी 5 तास करावा. संस्थांनी तसे वेळापत्रक तयार करुन ते जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयात सादर करावे.

**सदर परिपत्रक मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.**

करिता सचिव
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई-51.

प्रति,
मा. सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

प्रत :-

सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी.

D:\2019\K-1 letter 2019.docx